■ e-paper.diwanews.com ■ सोमवार, १७ फेब्रुवारी २०२५ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 www.diwanews.com

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

वर्ष-४

अंक-२९

# गायमुख येथील कचऱ्यापासून खतनिर्मितीचा प्रकल्प राज्यातील सर्वात मोठा ठरेल

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला विश्वास





## ठाणे शहरासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प

## ठाणे-घोडबंदर परिसरातील विकास प्रकल्पांची परिवहन मंत्री सरनाईक यांनी केली पाहणी

ठाणे: गायमुख येथे कचऱ्यापासून खतनिर्मितीचा प्रकल्प हा ठाणे शहराच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. तेथील दोन प्रकल्पांचे एकत्रिकरण करून अधिक मोठ्या जागेत हा प्रकल्प कार्यान्वित करावा. तीन एकराच्या जागेत सुमारे ३०० ते ४०० टन ओल्या कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावून खत निर्मिती होईल. राज्यातील अशाप्रकारचा हा मोठा प्रकल्प ठरेल, असा विश्वास परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

ठाणे शहर-घोडबंदर रोड परिसरातील चार विकास कामांची पाहणी केली त्यावेळी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सहाय्यक संचालक नगररचना संग्राम कानडे, उपायुक्त मनीष जोशी, शंकर पाटोळे, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, उपनगर अभियंता गुणवंत झांब्रे, कार्यकारी अभियंता संजय कदम आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात या चार महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी मोठा निधी दिला. त्याची कामे आता सुरू झाली आहेत. खत निर्मिती प्रकल्प, नागला बंदर खाडी किनारा सुशोभीकरण, बोरिवडे मैदानाचा विकास, आनंद नगर येथील आरक्षित भूखंडावरील उद्यान या कामांची पाहणी केली. त्याबाबत आवश्यक ते निर्देश आणि सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

तर, परिवहन मंत्री प्रताप सरानाईक यांनी दिलेल्या निर्देशांप्रमाणे गायमुख येथील महापालिकेच्या ताब्यातील जास्तीत जास्त जागेचा वापर करून ३०० ते ४०० टनांपर्यंतच्या ओल्या कचऱ्यापासून खत निर्मितीचा एकत्रित प्रकल्प करण्यात येईल, असे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी स्पष्ट केले.

राज्य शासनाच्या मूलभूत सोयी विकास योजनेअंतर्गत ठाणे महापालिकेस एकूण १५० कोटी रुपयांचा निधी उपबल्ध झाला आहे. त्यात, गायमुख येथे एकूण ९७ टन आणि नागला बंदर येथे ५० टन क्षमतेचा खत प्रकल्प तसेच, १.५ टन क्षमतेच्या खत निर्मितीच्या दोन मोबाईल व्हॅन यांचा समावेश आहे. राष्ट्रीय उद्यान आणि तुंगारेश्वर रेंज यांच्या मध्यभागी ही जागा असून प्रकल्पास वनखात्याची परवानगी मिळाली आहे.

सुमारे तीन एकर जागेवर या दोन्ही प्रकल्पांचे एकत्रीकरण करून गायमुख येथील महापालिकेच्या ताब्यातील सर्व जागेचा वापर करून मोठा प्रकल्प कार्यान्वित करावा, असे निर्देश सरनाईक यांनी दिले. शहराच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असल्यानेच त्यासाठी पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे, असेही सरनाईक म्हणाले.

नागला बंदर येथे राज्य शासनाच्या १५० कोटींच्या निधीतून मराठा साम्राज्याचे आरमार प्रमुख कान्होजी आंग्रे यांचे स्मारक विकसित करण्यात येत आहे. या स्मारक स्थळाची पाहणी सरनाईक यांनी केली. तसेच, स्थानिक रहिवाश्यांशीही संवाद साधला.

या भागातील सर्व बाधित कुटुंबांचे योग्य पुनर्वसन होईल, याची काळजी महापालिकेने घ्यावी. त्यांच्यासोबत बैठक घेऊन घरे, बोटींचे संवर्धन हे विषय मार्गी लावावेत. येथील स्थानिक हे एकप्रकारे कान्होजी आंग्रे यांचे वंशज आहेत. त्यामुळे त्यांचा योग्य तो सन्मान राखला जावा, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

घोडबंदर रोड प्रभाग क्र. १ मधील आरक्षणे व सुविधा भूखंड विकसित करण्याकरता महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सुविधांचा विकास या योजनेअंतर्गत राज्य सरकारकडून ७५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यातून बोरीवडे मैदान विकसित करून धर्मवीर आनंद दिघे क्रीडा संकुल बांधण्यात येत आहे. त्याचे भूमिपूजन करण्यात आले.

बोरिवडे मैदान आरक्षित भूखंडाचे क्षेत्रफळ ८४९७४ चौरस मीटर असून त्यापैकी ६८१९ चौरस मीटर क्षेत्रफळावर जिमखाना बांधण्यात येणार आहे. या जिमखान्यामध्ये विविध प्रकारच्या खेळांसाठी सुविधा असणार आहेत. त्यात, बॅडमिंटन कोर्ट, क्रिकेट प्रॅक्टिस नेट, कुस्ती, उपहारगृह आदी सुविधा असतील. तर, मल्लखांब, कबड्डी, हुतुतू, लाल मातीची कुस्ती, बास्केटबॉल कोर्ट , व्हॉलीबॉल कोर्ट, स्केटिंग ट्रॅक या मैदानी खेळांचाही समावेश आहे. तसेच, मैदानाचे पूर्णपणे सपाटीकरण करणे, संरक्षक भिंत आणि आकर्षक प्रवेशद्वार या कामांचाही प्रकल्पात समावेश आहे.

आनंद नगर येथे राज्य शासनाचा एक भूखंड म्हाडाच्या ताब्यात आहे. त्या जागेवर महापालिकेच्या उद्यानाचे आरक्षण आहे. त्यासाठी राज्य सरकारकडून ०२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झालेला आहे. या भूखंडावर असणाऱ्या स्वामी समर्थ यांच्या मठासाठी रस्त्यालगत नवीन वास्तू उभारण्यात आली आहे. त्याची पाहणी सरनाईक यांनी केली आणि मठाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. ही जागा रिक्त करून तेथे उद्यानासाठी महापालिकेस सहकार्य करावे. उद्यानास स्वामी समर्थ यांचे नाव देण्यात येईल. तसेच, या उद्यान आणि परिसराचे व्यवस्थापन मठाच्या माध्यमातून करावे. उद्यान सगळ्यांसाठी खुले राहील आणि त्यावर कोणतेही अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता संबंधितांनी घ्यावी, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५


# घरफोडीची हाफसेंच्युरी
# सराईत चोरट्यासह साथीदार पोलिसांच्या जाळ्यात







## ५४ लाखांचा मुद्देमाल हस्तगत; गुन्हे शाखेची कारवाई

**ठाणे :** ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील कल्याण, ठाणे, भिंवडी, बदलापुर,अंबरनाथ परिसरात घरफोडी करणाऱ्या सराईत लक्ष्मण सुरेश शिवशरण (४७) या चोरट्यासह त्याचा साथीदार सुकेश मुददणा कोटीयन (५५ ) अशा दुकलीला ठाणे शहर पोलिसांनी अटक केली. यामधील लक्ष्मण शिवशरण याने ठाणे शहर आयुक्तालयातील जवळपास सर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी केलेल्या तब्बल ५० गुन्ह्यांची कबुली दिली. त्या गुन्ह्यांपैकी काही गुन्ह्यांमधील सोन्याचे दागिन्यांसह रोख रक्कम असा ५४ लाखांहून अधिकचा मुद्देमाल त्याच्याकडून हस्तगत केला आहे. तो दिवसा किंवा रात्री बंद घरे फोडून चोरी करायचा याशिवाय त्याच्यावर यापूर्वी ३२ गुन्हे दाखल असल्याची माहिती ठाणे शहर पोलीस दलातील गुन्हे शाखा उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी मंगळवारी ठाण्यात घेतलेल्या एका पत्रकार परिषदेत बोलताना दिली.


ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील विष्णुनगर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्याचा तपास कल्याण गुन्हे शाखा करत होती. त्या गुन्हयातील घटनास्थळी व परिसरात असलेल्या सीसीटीव्ही. फुटेजाद्वारे संशयीत म्हणून भिवंडी मधील लक्ष्मण शिवशरण याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली देत, ते सोने त्याने सुकेश याला विक्रीसाठी दिल्याचे सांगितले. त्यानुसार त्याला अटक केली. याचदरम्यान लक्ष्मण याने अशाप्रकारे एकूण ५० गुन्ह्यांची कबुली देत, त्यापैकी काही गुन्ह्यांमधील ५३ लाख ४१ हजार २८० रूपये किमंतीचे ६६७ग्रॅम, ६६० मी.ली. वजनाचे सोन्याचे दागिने व ७८ हजार ९०० रूपये रोख असा एकुण ५४ लाख २० हजार १८० रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करून एकुण ५० घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले. तसेच लक्ष्मण याच्यावर यापूर्वी ठाणे आणि नवीमुंबई पोलीस आयुक्तालयात ३२ गुन्हे दाखल आहेत. त्यामधील १ गुन्हा हा नवीमुंबई पोलीस आयुक्तालयातील वाशी एपीएमसी पोलीस ठाण्यातील आहे. तो मूळचा सोलापूर कर असून सध्या तो भिवंडी, कशेळी गावात राहत आहे. तर त्याचा साथीदार सुकेश हा मूळ मंगलोरचा असून सध्या तो मीरा भाईंदर परिसरात राहत आहे. यागुन्ह्यात अजून त्याचे काही साथीदार आहेत का? तसेच चोरीच्या इतर गुन्ह्यातील मुद्देमाल त्यांनी कुठे ठेवला किंवा विक्री केला याचा तपास सुरू आहे.

ही कारवाई गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली

कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक संतोष उगलमुगले, पोलीस उपनिरीक्षक विनोद पाटील, पोलीस अमलंदार दत्ताराम भोसले, अशोक पवार, बालाजी शिंदे, आदिक जाधव, विलास कडु, अनुप कामत, प्रंशात वानखेडे, गोरखनाथ पोटे, प्रविण बागुल, उल्हास खंडारे, सुधिर क़दम, वसंत चौरे, सचिन वानखेडे, दिपक महाजन, गुरूनाथ जरग, मिथुन राठोड, विजेंद्र नवसारे, विनोद चन्ने, गोरक्ष शेकडे, सतिश सोनवणे, महिला पोलीस अंमलदार ज्योत्स्ना कुंभारे, मिनाक्षी खेडेकर, मंगल गावित पोलीस उपनिरीक्षक अमोल बोरकर या पथकाने केली.

## डम्पिंगवर कचरा पेटला

**ठाणे :** डायघर डम्पिंग ग्राउंडवरील कचऱ्याने अचानक पेट घेतल्याची घटना बुधवारी रात्री पावणे अकरा वाजण्याच्या सुमारास समोर आली. ती आग जवळपास सहा तासांनी म्हणजे गुरुवारी मध्यरात्री दीड वाजण्याच्या दरम्यान नियंत्रणात आणण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसून यावेळी ४ फायरची वाहने पाचारण करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.



## वेश्या व्यवसायास परावृत्त करणाऱ्या दलालास अटक

**ठाणे:** एका महिलेच्या असहाय्य फायदा घेऊन तिला वेश्यागमन करण्यास लावणाऱ्या दत्ताराम सीताराम सावंत (५८) या दलालाला ठाणे शहर पोलिसांच्या अनैतिक मानवी प्रतिबंधक कक्षेने अटक केली. याचदरम्यान त्या महिलेची पोलिसांनी सुटका केली आहे.

यशोधन नगर या ठिकाणी एक पुरूष दलाल काही पिडीत व असहाय्य महिलांना फ ुस लावुन वेश्यागमनासाठी स्वतःचे राहते घरी बोलवणार असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांनी मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने दलाल सावंत याला ताब्यात घेत, त्याच्या रखवालीत असलेल्या एका पिडीत महिलेची तात्काळ सुटका केली.याप्रकरणी वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटक केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## रिक्षामधून चेंबर झाकण घेऊन चोरटे पसार
### प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद


**ठाणे :** टिकुजिनी वाडी येथील कल्पतरू हिल्स फेज २ या इमारतीच्या गेटच्या समोरील चेंबरचे लोखंडी झाकण रिक्षामध्ये टाकून दोन जण पसार झाले आहेत. हा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्यानंतर तेथील रहिवाशांमुळे चोरीची घटना समोर आली.

११ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री सव्वातीन वाजण्याच्या सुमारास दोन चोरटे रिक्षाने त्या इमारतीच्या गेट वर आले आणि थांबले. त्यातील टी शर्ट घातल्याने एका चोरट्याने कोणी नाही ना याची पाहणी केली. कोणी दिसत नसल्याचे पाहून ते झाकण थोडे उचलून बाजूला केले. त्यानंतर रिक्षा चालकाचा पोशाख परिधान केला दुसरा चोरटा आला आणि दोघांनी ते झाकण उचलून रिक्षा ठेवून तेथून धूम ठोकली. हा सर्व प्रकार त्या परिसरात लावलेल्या सोसायटीच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला. त्यानंतर झाकण चोरीला गेल्याचा प्रकार समोर आल्यावर त्यांनी ही बाब ठामपा आपत्ती व्यवस्थापन कक्षेला सीसीटीव्ही फुटेजद्वारे निर्देशनास आणून दिली. तसेच या प्रकारची योग्य ती पोलीस कारवाई करावी. अशी विनंती महानगरपालिकेच्या अधिकारी वर्गास रहिवाशी विनोद जगदाळे यांनी केली. त्यानुसार याबाबत ठामपा आपत्ती व्यवस्थापन विभागाने संबंधित विभागाला याबाबत माहिती दिल्यानंतर ही दिवसभरात त्या विभागाने गुन्हा दाखल केला नाही. तसेच शुक्रवारी याची तक्रार पोलीस ठाण्यात जाऊन देण्यात येईल. माहिती सूत्रांनी दिली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५


# जीबीएस विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी झेडपीमार्फत पाण्याचे निर्जंतुकीकरण



**ठाणे : राज्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोम (जी.बी.एस) विषाणूंचा तसेच अन्य साथीच्या रोगांचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरिता पाण्याचे निर्जंतुकीकरण ग्रामपंचायत स्तरावर पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची, वितरण बिंदूच्या (शाळा, अंगणवाडी, घरे इत्यादी) पाणी नमुन्यांची गावातील प्रशिक्षित महिला स्वयंसेवकांमार्फत प्रत्येक महिन्याला एकदा जैविक क्षेत्रीय तपासणी संचाद्वारे (-२) तपासणी करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.**




## ठाणे ग्रामीण भागातील ५ हजार ४३० जल स्त्रोतांची तपासणी

याचदरम्यान ग्रामीण भागातील ५ हजार ४३० जल स्त्रोतांची तपासणी करण्यात आली आहे. जीबीएस विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शुद्ध पाणी पुरवठा होण्याच्या अनुषंगाने गाव पातळीवर नळ पाणीपुरवठा योजनांचे स्रोत शाळा, अंगणवाडी व नळाद्वारे घरामध्ये उपलब्ध होणारे पाणी यांच्या जैविक तपासणीसाठी आवश्यक पाणी नमुने अभियान स्वरूपामध्ये गोळा करून नजीकच्या भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या प्रयोगशाळेमध्ये जमा करून प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रयोगशाळेत जैविक तपासणी करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

ग्रामीण भागातील घरगुती व सार्वजनिक स्रोत २ हजार ३६५, ग्रामपंचायत कार्यालय ४३१, शाळा १ हजार २६९, अंगणवाडी केंद्र १ हजार १५२, आरोग्य केंद्र ३३, उपकेंद्र १८० असे एकूण ५ हजार ४३० जल स्त्रोतांची तपासणी करण्यात येत आहे.

ग्रामीण कुटुंबाला कार्यात्मक घरगुती नळ जोडणीद्वारे पुरेशा प्रमाणात किमान ५५ लिटर पाणी प्रतिदिन प्रतिव्यक्ती विहित गुणवत्तेचे पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे त्याअनुषंगाने जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील जनतेला घरगुती व सार्वजनिक स्रोत, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी केंद्र, आरोग्य केंद्र, उपकेंद्र इत्यादी सातत्यापूर्वक गुणवत्तापूर्वक शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात कामकाज सुरू करण्यात आले आहे.

ग्रामीण जनतेला गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात पाणी गुणवत्ता सह नियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम ग्रामीण भागात गावागावात राबविण्यात यावा याद्वारे गावातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची व घरगुती नळ कनेक्शन द्वारे पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याची (किमान दोन नमुने) रासायनिक तपासणी वर्षातून एकदा व जैविक तपासणी वर्षातून दोनदा प्रयोगशाळेत जमा करण्यात यावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व प्रकल्प संचालक जलजीवन मिशन प्रमोद काळे यांनी केले आहे.


# टीडीआरएफ जवानांप्रमाणेच अन्य कर्मचाऱ्यांनाही न्याय द्यावा

**ठाणे :** महापालिकेने आपत्ती व्यवस्थापनासाठी नेमलेल्या टीडीआरएफ जवानांप्रमाणेच महापालिकेच्याच आरोग्य, पाणीपुरवठा आणि घनकचरा विभागात वर्षानुवर्षे कंत्राटी पद्धतीने कार्यरत कर्मचाऱ्यांना मानधन तत्वावर सेवेत घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेऊन न्याय द्यावा, अशी मागणी भाजपाचे माजी गटनेते नारायण पवार यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याकडे केली आहे.

**भाजपाचे माजी गटनेते नारायण पवार यांची मागणी**

ठाणे महापालिकेने काही महिन्यांपूर्वी टीडीआरएफ पथकातील ३० जवानांना कायमस्वरुपी सेवेत दाखल करुन घेण्याचा प्रस्ताव मंजूर केला. या जवानांना सुमारे सात वर्षांपूर्वी ठाणे महापालिकेच्या सेवेत दाखल करून घेण्यात आले होते. या जवानांप्रमाणेच कोरोनाची महामारी, पूरपरिस्थिती, कडाक्याची थंडी वा असह्य उन्हाळ्यातही महापालिकेच्या आरोग्य, पाणीपुरवठा आणि घनकचरा विभागातील कामगारांकडून कर्तव्य बजाविले जाते. कोरोना आपत्तीच्या काळात मृत्यूची टांगती तलवार असतानाही महापालिकेच्या शेकडो कंत्राटी कामगारांनी जीव धोक्यात घातला होता. शहरात स्वच्छता राखण्याबरोबरच पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी कर्मचारी कार्यरत होते. स्वच्छता करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी महापालिकेला राष्ट्रीय स्तरावरील स्वच्छतेचा पुरस्कार मिळवून देऊन ठाण्याचा झेंडा फडकविला होता.

या कर्मचाऱ्यांमध्ये बहुतांशी कंत्राटी कर्मचारी आहेत. ते गेल्या २० ते २५ वर्षांपासून ठेकेदाराकडे काम करीत आहेत. आता त्यांना वाढत्या वयामुळे नव्या नोकरीची संधी मिळणार नाही. महापालिकेच्या सेवेत प्रामाणिकपणे काम करूनही त्यांना महापालिकेत अनेक वर्षानंतरही मानधन तत्वावर नोकरीची संधी मिळालेली नाही, या कर्मचाऱ्यांबाबत मानवता व सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेवून आरोग्य, पाणीपुरवठा आणि घनकचरा विभागात कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मानधन तत्वावर सेवेत सामावून घेण्याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी माजी गटनेते नारायण पवार यांनी केली आहे.



# शिक्षण विभागाकडून ५२ शिक्षकांना पदोन्नती

## ४१ शिक्षक झाले मुख्याध्यापक

**ठाणे:** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग ३ श्रेणी ३ या पदासाठी केंद्रप्रमुख / मुख्याध्यापक / शिक्षक संवर्गातून ११ पात्र शिक्षकांना पदोन्नती देण्यात आली व मुख्याध्यापक पदावर ४१ पात्र शिक्षकांना पदोन्नती देण्यात आली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली पदोन्नती देण्यात आली आहे.

शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे, अधीक्षक सारासे बी. ए. गोमासे, विस्तार अधिकारी (शिक्षण) आशिष झुंजारराव तसेच शिक्षण विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी व कर्मचारी यांनी यासाठी प्रयत्न केले. या कार्यक्रमात शिक्षक व शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या विविध लाभाबाबत पाठपुरावा वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी घेत असल्याने शिक्षण विभागातील ५२ शिक्षकांना पदोन्नतीचा लाभ देण्यात आला आहे. याबाबत संबंधित शिक्षक व शिक्षक संघटना यांनी समाधान व्यक्त केले. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांचे आभार व्यक्त केले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५



## ठामपात संत रविदास महाराजांना अभिवादन

**ठाणे :** ठाणे महानगरपालिका मुख्यालयात, संत रविदास महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## शिवचरित्र पारायणाला राहनाळ जिल्हा परिषद शाळेत सुरू

**ठाणे :** छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र ऐकणे म्हणजे जीवन जगण्याला मोठी ऊर्जा मिळते. शिवरायांचे आचार, विचार, पराक्रम, रयतेवरील राजाचं प्रेम, युद्ध तंत्र, या सर्व गोष्टी आपल्याला प्रचंड ऊर्जा आणि आनंद देणाऱ्या आहेत त्यामुळे जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे शिवचरित्र पारायण सुरू करण्यात आले आहे.

शाळेतील शिवचरित्र पारायणाचे हे चौथे वर्षे आहे. जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे ३ फेब्रुवारी पासून शिवचरित्र पारायणाला सुरूवात झाली. शाळेचे मुख्याध्यापक अजय पाटील यांनी शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र आणि संतांची कामगिरी, कथा विद्यार्थ्यांसमोर कथन करून या कार्यक्रमाची सुरूवात केली आहे तर शिक्षक अंकुश ठाकरे यांनी छत्रपती शिवरायांचा जन्म, प्रताप गडावरील पराक्रम, संध्या जगताप यांनी शिवरायांचे बालपण, चित्रा पाटील यांनी स्वराज्याची शपथ, तर माया सोनकांबळे यांनी तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. ही कथा उत्कृष्टपणे सादर केले आहेत. स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त, रसिका पाटील यांनी पन्हाळगडावरून विशालगडावर ही कथा मुलांना सांगितली.

या उपक्रमाची संकल्पना शाळेचे मुख्याध्यापक अजय पाटील यांची असून ३ फेब्रुवारीपासून सुरू झालेले शिवचरित्र पारायण १९ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. मुलं अत्यंत तन्मयतेने या कथा ऐकत आहेत. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ढोल, ताशा, लेझीम च्या गजरात संपूर्ण गावातून राजांची मिरवणूक काढून शाळेमध्ये विविध कार्यक्रम घेतले जाणार आहेत. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पाडण्यासाठी असे विशेष उपक्रम सर्व जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी घ्यावे, असे आवाहन यानिमित्ताने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

शिवचरित्र पारायणावर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला स्पर्धा घेतली आहे. तसेच शनिवारी पावनखिंड हा चित्रपट दाखविला. या शिवचरित्र पारायणाची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात सुरू आहे.

## ५० वर्षांनी ठाण्यात सेंट जॉन द बॅप्टिस्ट हायस्कूलच्या १९७५ बॅचचे हृदयस्पर्शी पुनर्मिलन

**ठाणे –** ठाण्यातील सेंट जॉन द बॅप्टिस्ट हायस्कूलच्या १९७५ च्या पहिल्या एस.एस.सी. बॅचच्या माजी विद्यार्थ्यांसाठी ११ फ`ब्रुवारी २०२५ हा दिवस खास ठरला. पन्नास वर्षांनंतर या विद्यार्थ्यांनी शाळेत परत येत जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि शालेय जीवनाच्या प्रवासावर चिंतन केले.

ही ऐतिहासिक भेट शाळेच्या सध्याचे प्राचार्य फा. थॉमसन किनी यांच्या उपस्थितीत झाली. संस्थेने गेल्या काही दशकांत केलेल्या प्रगतीचा आढावा घेत, माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या अनुभवांची देवाणघेवाण केली. या प्रसंगी बोलताना प्राचार्य फा. थॉमसन किनी म्हणाले, ‘‘आमच्या विद्यार्थ्यांना समाजात ठसा उमटवताना पाहणे अत्यंत आनंददायी आहे. इतक्या वर्षांनंतरही त्यांनी शाळेशी नाते कायम ठेवले आहे, हे पाहून समाधान वाटते.‘‘

या पुनर्मिलनात विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनाच्या आठवणी शेअर केल्या आणि शिक्षकांनी त्यांच्यावर केलेल्या संस्कारांची आठवण काढली. शाळेच्या प्रगतीबद्दल चर्चा करताना, विद्यार्थ्यांनी संस्थेच्या उल्लेखनीय वाटचालीबद्दल अभिमान व्यक्त केला.

१०० वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात योगदान देणाऱ्या सेंट जॉन द बॅप्टिस्ट हायस्कूलने ठाण्यात प्रतिष्ठित स्थान मिळवले आहे. केवळ शैक्षणिक गुणवत्ता नाही, तर सामाजिक आणि नैतिक मूल्यांचा ठसा विद्यार्थ्यांवर उमटवणारी ही संस्था आहे.

या पुनर्मिलनाच्या माध्यमातून, शिक्षणाच्या चिरस्थायी प्रभावाची प्रचीती आली. माजी विद्यार्थी आणि शिक्षकांचा हा भावनिक सोहळा हा केवळ आठवणींचा प्रवास नव्हता, तर शालेय जीवनाने घडवलेल्या मूल्यांची आणि संस्कारांची पुन्हा एकदा जाणीव करून देणारा क्षण ठरला.



## ५० वर्षांवरील कलाकारांसाठी एकांकिका स्पर्धा

**ठाणे :** मराठी रंगभूमी वर बऱ्याच एकांकिकां स्पर्धा होत असतात. त्यातल्या कित्येक स्पर्धा आंतरमहाविद्यालयीन किंवा खुल्या असतात. ह्या स्पर्धांमध्ये तरुणाईचा जल्लोष आणि उत्साह दिसून येतो. फार क्वचितच कधीतरी ५० वयाच्या पुढचे कलाकार दिसून येतात. पण तसं पाहायला गेलं हाच वयोगट सर्वात जास्त अनुभवी असतो. खास ह्याच ५० आणि त्यापेक्षा जास्त वयाच्या लोकांसाठी सॉफ्ट कॉर्नर प्रस्तुत उत्तरार्ध एकांकिका स्पर्धा भरवण्यात आली आहे. ह्या स्पर्धेचे आयोजन मोरया – इव्हेंट्स अँड एंटरटेनमेंट करत आहेत.

स्पर्धेच्या नियोजनात अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, ठाणे शाखेचे विशेष सहकार्य लाभणार आहे. कलेला वय नसतं असं म्हणतात पण तरुणाईच्या जल्लोषात ५० आणि त्यापेक्षा जास्त वय असणाऱ्यांना एकांकिका स्पर्धेत सादरीकरण करण्याची संधी फार कमी वेळा मिळते. वास्तविक पाहता हाच वर्ग सर्वात जास्त अनुभवी व संयमी असतो. अशा वयोगटाला एकांकिका सादर करण्याची संधी मिळावी आणि त्यातून तरुणाईला त्यांच्या अभ्यासपूर्ण सादरीकरणाने शिकायला मिळावा या हेतूने स्पर्धा आयोजित केली जात आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५
पान : ५
www.diwanews.com



# पर्यावरण पूरक प्रकल्पांकरता अर्थसहाय्य मिळवण्यासाठी ठाणे महापालिका प्रयत्नशील - आयुक्त सौरभ राव

## अर्थसहाय्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळासह झाली प्राथमिक चर्चा

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या पर्यावरणपूरक विविध प्रकल्पांसाठी केंद्र सरकार तसेच आंतरराष्ट्रीय वित्त संस्थांकडून अर्थसहाय्य मिळवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळ (इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन) या संस्थेशी प्राथमिक चर्चा झाली आहे. अर्थसहाय्याच्या विविध पर्यायांबाबत ही संस्था महापालिकेस सहकार्य करणार असल्याची माहिती ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव यांनी दिली आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना विविध प्रकल्पांसाठी अनुदान, तफावत निधी, कर्ज या प्रकारचे अर्थसहाय्य मिळवून देण्यासंदर्भात केंद्र सरकारच्या मान्यतेनुसार आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळ आणि राज्य सरकार यांच्यात करार झाला आहे. हे महामंडळ राज्यातील काही महापालिकांना अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी सहकार्य करणार असून त्यात ठाण्याचाही समावेश आहे. यासंदर्भात, बुधवारी ठाणे महापालिकेच्या नागरी संशोधन केंद्र येथे प्राथमिक बैठक झाली. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळाचे प्रतिनिधी, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, मुख्य लेखा वित्त अधिकारी दिलीप सुर्यवंशी, उपनगर अभियंता विकास ढोले, विनोद पवार, गुणवंत झांब्रे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान आदी उपस्थित होते. राज्य सरकारच्या मित्रा या उपक्रमाचे प्रतिनिधी ऑनलाईनपद्धतीने या बैठकीत सहभागी झाले होते.

ठाणे महापालिका पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी कटीबद्ध असून त्यादृष्टीने सीईईडब्ल्यूच्या सहकार्याने कृती आराखडाही तयार करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात, सांडपाण्याचे अतिशुद्ध पाण्यात रुपांतर करण्यासाठी १०० दशलक्ष लीटर क्षमतेचा शुद्धीकरण प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर करण्याचा विचार महापालिका करीत आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा निधी कसा उभारणार, त्याची परतफेड कशी करणार, त्या पाण्याची खरेदी कोण करू शकेल, त्या पाण्याचा दर किती असावा याचा अभ्यास सुरू आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकार किंवा आंतरराष्ट्रीय वित्त संस्थांकडून अर्थसहाय्य मिळवण्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळासोबत प्राथमिक चर्चा झाली आहे. त्यांचे प्रतिनिधी या प्रस्तावाचा सविस्तर अभ्यास करून अर्थसहाय्याचे विविध पर्याय सूचविणार असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी स्पष्ट केले.

त्याचबरोबर, पाणी पुरवठा योजना, नवीन जलवाहिन्या, नवीन मलनि:सारण वाहिन्या, घनकचरा प्रक्रिया केंद्र, तलावांचे संवर्धन आदी प्रकल्पांबाबत केंद्र किंवा वित्त संस्थाकडून कोणत्या पद्धतीने अर्थसहाय्य उपलब्ध होऊ शकेल याच्याबाबत अभ्यास करण्याची सूचनाही आयुक्त राव यांनी केली. नगर अभियंत्यांच्या समन्वयाने या प्रकल्पांची विस्तृत माहिती घेऊन त्याबद्दल अहवाल देण्याबद्दल आयुक्त राव यांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या विविध योजनांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांना विविध विकास प्रकल्पांसाठी तसेच पायाभूत सुविधांसाठी अर्थसहाय्य केले जाते. त्याचबरोबर, नुकत्याच सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात नागरी आव्हान निधीची घोषणाही करण्यात आली आहे. यातून ठाणे महापालिकेच्या कोणत्या प्रकल्पांना अर्थसहाय्य मिळू शकते याचा अभ्यास आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळ करणार असल्याचेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.




## रात्रीस खेळ चाले...
# नौपाड्यात हा टपऱ्यांचा!



# भाजपाचे अध्यक्ष संजय वाघुलेंच्या विरोधानंतर टपऱ्या हटविल्या

**ठाणे : महापालिकेने मंजूर केलेल्या जागेऐवजी रस्त्यालगतच्या मोक्याच्या फूटपाथवर दोन टपऱ्या थाटण्याचा प्रयत्न भाजपाचे अध्यक्ष संजय वाघुले यांच्यासह कार्यकर्त्यांनी फोल ठरविला. भाजपा कार्यकर्त्यांच्या जोरदार विरोधानंतर मध्यरात्री दोनच्या सुमारास रात्रीचा खेळ करून ठेवलेल्या टपऱ्या कंत्राटदाराने हटविल्या.**

ठाण्याचा मानबिंदू असलेल्या तलावपाळी च्या फूटपाथ व नौपाड्यातील सारस्वत बँकेसमोरील फूटपाथ मोकळा करण्यात भाजपा कार्यकर्त्यांना यश आले.

सामान्य नागरिक व पादचाऱ्यांना अडथळा निर्माण होणार नाही, अशा पद्धतीने रस्त्यालगतच्या मोकळ्या जागेत स्टॉल वा टपऱ्या उभाराव्यात, असे उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. परंतु, ठाणे महापालिकेच्या काही अधिकाऱ्यांनी नियमावली गुंडाळून मोकळ्या जागांऐवजी चक्क फ ूटपाथवरच टपऱ्या बसविण्याचा घाट घातला आहे, असा आरोप भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी केला.

नौपाड्यातील सारस्वत बँकेसमोर व तलावपाळीतील फूटपाथवर काल मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास महापालिकेचा लोगो असलेले स्टॉल ठेवण्यात आले. एका ठिकाणी स्टॉल मंजूर करुन प्रत्यक्षात मोक्याच्या ठिकाणी स्टॉल थाटण्याचा हा उद्योग होता.

पादचाऱ्यांना अडथळा होतील, असे स्टॉल वा टपऱ्या ठेवल्याचे लक्षात आल्यानंतर, संजय वाघुले यांनी तत्काळ महापालिकेच्या संबंधित विभागांना तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. त्याची दखल घेऊन संबंधित कंत्राटदाराने पोकलेनच्या मशीनने हे स्टॉल हटविले. तूर्त सारस्वत बँकेसमोरील स्टॉल हटविला असून, तलावपाळी येथील स्टॉलही उचलणार असल्याचे कंत्राटदाराने मान्य केले.

रात्रीचा खेळ करून नौपाड्यात टपऱ्या ठेवण्याचा उद्योग सहन केला जाणार नाही. ठाण्यातील फूटपाथ हे पादचाऱ्यांना चालण्यासाठी मोकळे राहिले पाहिजेत. फूटपाथवर अडथळा आणण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा संजय वाघुले यांनी दिला. या टपऱ्यांना विरोध करण्यावेळी माजी नगरसेवक सुनेश जोशी, नौपाडा मंडल महिला मोर्चाच्या अध्यक्षा वृषाली वाघुले, युवा मोर्चाचे शहर सरचिटणीस प्रशांत कळंबटे, अल्पसंख्यक मोर्चाचे शहराध्यक्ष शरीफ शेख, हनीफ खान, संहिता देव, मंगेश ओक आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय लोकअदालतीचे २२ मार्च रोजी आयोजन

**ठाणे :** प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास ब्रि. अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार, २२ मार्च २०२५ रोजी 'राष्ट्रीय लोकअदालत'चे आयोजन करण्यात आले आहे. न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे आणि दाखल पूर्व प्रकरणे सुनावणीसाठी लोक अदालतीमध्ये ठेवता येतील. संबंधितांनी ठाणे जिल्ह्यातील ठाणे जिल्हा न्यायालय व सर्व तालुक्यातील न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी व राष्ट्रीय लोकअदालतीचा लाभ घेण्यासाठी येत्या शनिवार, २२ मार्च २०२५ रोजी आयोजित केलेल्या लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे ठेवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, न्या. ईश्वर कां. सुर्यवंशी यांनी केले आहे.

२२ मार्च २०२५ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये धनादेश अनादर प्रकरणे, बँकेचे कर्ज वसूली प्रकरणे, कामगारांचे वाद, कर वसुलीचे प्रकरणे, विद्युत आणि पाणी देयक बद्दलची प्रकरणे आणि इतर आपसात तडजोड पात्र प्रकरणे, वैवाहिक व इतर दिवाणी वाद ही दाखल पूर्व प्रकरणे ठेवता येतील.

आपली प्रलंबित तसेच दाखल व्हावयाचे आहेत अशी प्रकरणे २२ मार्च २०२५ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवण्याकरिता संबंधित न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा समिती प्राधिकरण यांच्या कार्यालयांशी संपर्क साधावा आणि लोक अदालतीमध्ये सहभागी होऊन आपले वाद सामोपचाराने कामचे मिटवावेत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ठाणे सचिव न्या. ईश्वर सुर्यवंशी यांनी केले आहे.

॥ एकमेका सहाय्य करूं, अवघे धरूं सुपंथ ॥ स्थापना १९८७

स्नेही सहकारी पतसंस्था मर्या. मुंबई

बीओएम/ डब्लूडी /आर.एस.आर./(सि.आर.)/४००/१९८६-८७

प्रशासकीय कार्यालय :- स्नेही भवन, ३१५ बस डेपो जवळ, हॉटेल सेलिब्रेशनच्या बाजूला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१. संपर्क : ८५९९१८६६८९०

Email: snehipatsanstha.bandra@gmail.com

◆ प्रभावी व्यवस्थापन ◆ नवा विश्वास ◆ नवी उमेद

✻ शाखा ✻

- बांद्रा - ८५९९१८६६८९०
- नायगाव (वसई) - ९०८२३६२१४३
- मलकापूर (कोल्हापूर) - ९४०३७६७१३४
- अंबाडी(भिवंडी) - ८९९९६३८२२२
- दिवा (ठाणे) - ७४००४५४१६८

| | |
|---|---|
| अधिकृत भागभांडवल | :- रु. ५ कोटी |
| वसुल भागभांडवल | :- रु. १ कोटी |
| एकुण ठेवी | :- रु १२ कोटी |
| कर्ज | :- रु. ८.५ कोटी |
| गुंतवणूक | :- रु. २ कोटी |
| खेळते भांडवल | :- रु. २५ कोटी |





दामदुप्पट ठेव

मुदत ७ वर्ष ६ महिने

संस्थेच्या आकर्षक ठेव योजना व व्याज दर

मुदत ठेव

| | |
|---|---|
| ३० दिवस ते ९० दिवसांपर्यंत | :- ६% |
| ९१ दिवस ते १८० दिवसांपर्यंत | :- ७% |
| १८१ दिवस ते ३६४ दिवसांपर्यंत | :- ८% |
| १ वर्ष पूर्ण | :- ९ % |
| २ वर्ष पूर्ण | :- ९.५० % |
| ३ वर्ष पूर्ण | :- १०% |

ज्येष्ठ नागरिक यांना अर्धा टक्के व्याज अधिक

आवर्त ठेव

१ वर्ष ८% | २ वर्ष ९% | ३ वर्ष १०%

दैनंदिन (धनलक्ष्मी) ठेव

६ महिने पूर्ण ३.५% | १ वर्ष ६% | २ वर्ष ७% | ३ वर्ष ८%

✻ संस्थेची ठळक वैशिष्ट्ये ✻

- तत्पर सेवा
- मायक्रो फायनान्स (ग्रुप लोन)
- कुशल व उच्च शिक्षित अभ्यासु नेतृत्व

सोने तारण कर्जाची खास सोय

त्वरीत जवळच्या शाखेत संपर्क साधावा

## ज्येष्ठ कथक नृत्यांगना गुरु डॉ. मंजिरी देव यांचा १६ फेब्रु.रोजी पंचाहत्तरीचा सोहळा

ठाणे - नृत्यकलेला संपूर्ण जीवन समर्पित करत सशक्त समाज कथक नृत्याद्वारे गेली ४८ वर्षे घडविणाऱ्या ठाणे भूषण गुरुवर्या डॉ. मंजिरी श्रीराम देव यांचा पंचाहत्तरी सोहळा १६ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे सकाळी ९.३० वाजता अनेक दिग्गजांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.



कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तर विशेष अतिथी म्हणून खासदार नरेश म्हस्के, पर्यटनमंत्री प्रताप सरनाईक, संगीत नाटक अकादमीच्या चेअरमन डॉ. संध्या पुरेचा, आमदार संजय केळकर, पद्मश्री गुरु डॉ. पुरु दाधीच, पद्मभूषण डॉ. एन. राजम, पद्मभूषण बेगम परवीन सुलताना, पद्मश्री पं. सतीश व्यास, डॉ. मिलिंद पाटील, डॉ. विभा दाधीच आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

प्रथम गुरु पं. बद्रिनाथ कुलकर्णी, त्यांच्या गुरु सुश्री. आशाताई जोगळेकर, गुरु पद्मश्री नटराज गोपीकृष्ण आणि गुरु पद्मश्री डॉ. पुरु दाधीच या चारही गुरुंची छाप आणि गुरुनिष्ठा डॉ. मंजिरी श्रीराम देव यांच्या एकल नृत्य सादरिकरणात अगदी सहज दिसते. प्रत्येक गुरुकडून मिळालेली एक- एक बंदिश, रचना त्या प्रसादरुपी मानतात आणि तशीच्या तशी त्या सादर करतात. आजवर डॉ. सौ. मंजिरी श्रीराम देव यांनी संगीत भूषण पं. राम मराठे संगीत महोत्सव, शारदा संगीत महोत्सव, कथक कला केंद्र दिल्ली महोत्सव, कोरिअन फुल मुन उत्सव, अमेरिकेत तौर्य उत्सव अशा अनेक मोठ्या समारंभात एकल कथक प्रदर्शन केले आहे.

महाराष्ट्रातील ज्येष्ठ नृत्यांगना म्हणून डॉ. मंजिरी श्रीराम देव यांची ओळख असून त्यांनी महाराष्ट्र ते अन्य राज्यांच्या लोक परंपरेलाही मान दिला आहे. वासुदेव, कडकलक्ष्मी, भारूड, भांगडा, घुमर, कोळी, बिहू अशा अनेक लोकनृत्यांचे कार्यक्रम त्यांनी केले आहेत.

गुरु डॉ. मंजिरी देव यांच्या आजवर ३०० हून अधिक विशारद आणि अलंकार एम.ए. पदवी धारक शिष्यगण भारतासहित दुबई, सिंगापूर, अमेरिका, ऑस्ट्रेलिया अशा अनेक देशांमध्ये नृत्यगुरू आणि कथक कलाकार म्हणून नाव मिळवित आहेत.

पंचाहत्तरी सोहळ्यास हजारोंच्या संख्येने त्यांचा शिष्य परिवार अमृत मंजिरी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचे आयोजन मुकुंदराज देव यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होत आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५
पान : ७
www.diwanews.com

SHWAAS
Our Passion Your Care
ACE NX HOSPITAL & RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital

२५,००० ते २,००,००० पर्यंत विमा योजना



मुख्यमंत्री सहायता निधी
CM Relief Fund

फुफ्फुस प्रत्यारोपण
हिप रिप्लेसमेंट
अपघात शस्त्रक्रिया
कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
लहान बालकांचे शस्त्रक्रिया
अपघात
हृदयरोग
डायलिसिस
हाताचे प्रत्यारोपण
गुडघ्यांचे प्रत्यारोपण
विद्युत अपघात रुग्ण
नवजात शिशुंचे आजार
बर्न रुग्ण
मेंदूचे आजार
कर्करोग शस्त्रक्रिया

Address
Mahavir height, Golul Nagari, opp. Mumbai University, Wayle Nagar, Khadakpada, Kalyan, Maharashtra- 421301

Emergency
7777008464
9076229076




# प्राथमिक शिक्षक समितीच्या अध्यक्षपदी विनोद लुटे

## ठाणे जिल्हा कार्यकारणी जाहीर

**ठाणे :** महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ठाणे जिल्हा शाखेचा मेळावा रविवार १६ फेब्रुवारी रोजी धर्मवीर आनंद दिघे सभागृह शहापूर येथे राज्य शिक्षक नेते उदय शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडला.

यावेळी ठाणे जिल्हा शाखेची पुनर्रचना करून नवीन जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यामध्ये जिल्हाध्यक्ष पदी विनोद लुटे तर, सरचिटणीस गुरुनाथ पवार, कार्याध्यक्ष संदीप भोईर, कोषाध्यक्ष संतोष जाधव यांची निवड करून त्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. जिल्हा संघटक गणेश बाविस्कर, जिल्हा उपाध्यक्ष म्हणून सुरेश जाधव, परशुराम घाणेकर, संतोष जाधव,तर कार्यालयीन चिटणीस अर्जुन बांबेरे, सहसचिव विजय गायकर यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. कोकण विभाग संपर्क प्रमुखपदी सुनील जाधव व शहापूर, भिवंडी तालुका नूतन कार्यकारणी ही जाहीर करण्यात आली. शहापूर तालुका नेते पदी पुरुषोत्तम ठाकरे,तालुका अध्यक्षपदी योगेश रोठे, सरचिटणीस तुषार सापळे, भिवंडी तालुकाध्यक्ष जगदीश झिंजाळ, महिला उपाध्यक्षपदी गीतांजली बाविस्कर यांची निवड जाहीर करण्यात आली.




## इंटरनेटच्या सुरक्षित वापराबद्दल सजग राहणे आवश्यक

### अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांचे प्रतिपादन

**ठाणे :** आपल्या आयुष्यात इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. त्यामुळे खाजगीपणा असा राहिलेलाच नाही. मोबाईलमुळे आपला प्रवास, आवडीनिवडी या सगळ्याचा डेटा गोळा केला जात असतो. अशा काळात इंटरनेटचा सुरक्षित वापर करणे, त्याबाद्दल सजग असणे ही अत्यंत आवश्यक गोष्ट झालेली आहे. त्यामुळे अशा कार्यशाळा महत्त्वाच्या असल्याचे प्रतिपादन ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी मंगळवारी केले.

ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आणि ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार मंगळवार, ११ फेब्रुवारी रोजी सुरक्षित इंटरनेट दिनाचे औचित्य साधून महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, एनआयसी यांच्या सहकार्याने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यास, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (माहिती तंत्रज्ञान) सचिन सांगळे, ठाणे जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी नरेंद्र भामरे आदी उपस्थित होते.

फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी जगभरात सुरक्षित इंटरनेट दिन साजरा केला जातो. या वर्षी, सगळ्यांच्या सहकार्याने उत्तम इंटरनेट या संकल्पनेवर आधारित जनजागृती कार्यशाळांचे देशभरातील सर्व जिल्ह्यांत आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी नरेंद्र भामरे यांनी दिली. सायबर गुन्ह्यांचे प्रमाण खूप वाढले आहे. त्याला पायबंद घालण्यासाठी जनजागृती हेच मोठे शस्त्र आहे. सायबर गुन्ह्याला नागरिकांनी बळी पडू नये, त्यांचे नुकसान होऊ नये यासाठी ही कार्यशाळा होत असल्याचे भामरे यांनी स्पष्ट केले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५ पान : ८
www.diwanews.com




## रक्तदाब, शुगरपासून कामगारांच्या सुटकेसाठी माझा लढा- आ.केळकर

## आ.संजय केळकर कर्मचारी हृदयसम्राट पुरस्काराने सन्मानित विविध कर्मचारी संघटनांचा मेळावा तुडुंब गर्दीत

**ठाणे:** विविध आर्थिक, सामाजिक आणि प्रशासकीय समस्यांमुळे कामगारांना रक्तदाब, शुगर यासारखे आजार जडले आहेत. या औषधांपासून त्यांची सुटका व्हावी, किंबहुना त्यांच्या समस्या सुटाव्यात यासाठी गेली अनेक वर्षे मी कामगारांच्या न्याय-हक्कासाठी झटत आहे. हजारो कामगारांच्या वतीने मला देण्यात आलेल्या कर्मचारी हृदयसम्राट पुरस्काराने माझी जबाबदारी आणखी वाढली आहे, याची जाणीव मला आहे, अशा शब्दांत आमदार संजय केळकर यांनी पुरस्काराला उत्तर देताना भावना व्यक्त केल्या.

कंपनी कामगार, ठाणे महापालिका कामगारांच्या विविध श्रेणीतील सुविधा, भत्ते, पदोन्नत्या, भविष्य निर्वाह निधी, सफाई कामगारांच्या वारसा हक्काचा प्रश्न अशा अनेक आघाड्यांवर न्याय मिळवून दिल्याबद्दल आमदार संजय केळकर यांचा ठाणे महापालिकेतील पाच कर्मचारी संघटनांच्या वतीने महाजनवाडी हॉल, खारकर आळी, ठाणे येथे आयोजित मेळाव्यात कर्मचारी हृदयसम्राट पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना केळकर बोलत होते.

सन २००६ ला विधान परिषदेचा आमदार, २०१४ पासून विधानसभेचा सलग तीन टर्म आमदार या काळात आणि त्याही आधीपासून वंचित घटक असलेले बूट पॉलिश कामगार, तसेच कंपनी कामगार आणि महापालिका कामगारांसाठी काम करत आहे. मी कामगारांचा नेता म्हणून कधीच काम केले नाही तर कामगार मित्र म्हणून त्यांच्या समस्या निर्मूलनासाठी आजवर लढत आलो. बंद पडलेल्या कंपन्यांचे कामगार देशोधडीला लागले, वर्षानुवर्षे थकबाकीपासून वंचित राहिले. पोयशा, मफतलालसारख्या अनेक कंपन्यांच्या हजारो कामगारांसाठी लढे दिले, देत आहे, त्यात यशही मिळत आहे. त्यांना मिळत असलेल्या न्याय-हक्कामुळे त्यांच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसतो, त्याचे मला मोठे समाधान मिळते. जनतेने मला दिलेले आमदार हे घटनात्मक पद सर्वसामान्य जनता आणि कामगारांच्या न्याय हक्कासाठी वापरणे हे मी माझे ध्येय ठेवले आहे, असे प्रतिपादन आमदार संजय केळकर यांनी कामगारांशी संवाद साधताना केले.

ठाणे महापालिकेतील विविध विभागातील विविध श्रेणीतील कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न सोडवले. सफाई कामगारांना सरसकट वारसा हक्काचा लाभ मोठा लढा देऊन मिळवून दिला. कामगार एकत्र असतील तरच त्यांना त्यांचे हक्क मिळतात. आणि जेव्हा ते एकत्र येतात तेव्हा त्यांच्यात फूट पाडणारे महाभागही सक्रिय होतात, त्यामुळे कर्मचाऱ्यांनी नेहमी सावध रहावे, असा सल्लाही केळकर यांनी दिला.

मी सुद्धा एकेकाळी कंपनीत पॅकिंग विभागात काम केले आहे. कामगारांच्या समस्यांची जाणीव मला आहे. त्या जाणीवेतून गेली अनेक वर्षे प्रशासनाशी कधी सामंजस्याने तर कधी आक्रमकपणे लढत आहे. कामगारांच्या जीवावर आस्थापना चालतात, त्यामुळे त्यांची अडवणूक झाली तर मी खपवून घेणार नाही, असा इशाराही केळकर यांनी व्यासपीठावरून दिला.

पाच कर्मचारी संघटनांच्या पुढाकाराने ठाणे महापालिका कर्मचाऱ्यांचा तुडुंब गर्दीत झालेला मेळावा आजवरचा सर्वात मोठा मेळावा ठरला. ठाणे महापालिका कर्मचारी वर्गातर्फे दत्ता घुगे आणि अजित मोरे हे मुख्य आयोजक होते. तर या भव्य आयोजन समितीत क्रांती संघटना (ठाणे महानगरपालिका) अध्यक्ष सुधाकर शिंदे, स्वच्छता निरीक्षक संवर्ग संघटना (महाराष्ट्र राज्य) अध्यक्ष लक्ष्मण पुरी, वाहनचालक संघटना (ठाणे महापालिका) हरिश्चंद्र देशमुख, महाराष्ट्र म्युनिसिपल लेबर युनियनचे अध्यक्ष रवींद्र शिंदे, धर्मवीर आरोग्य कामगार सेना महाराष्ट्र उपाध्यक्ष मनोज परब यांचा समावेश होता. संघटनांच्या प्रमुखांनी आमदार संजय केळकर यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

### केळकर साहेब प्रत्येकाच्या घरातील आमदार-आ.डावखरे

**सर्वसामान्य नागरिक असो, कामगार असो कोणीही असो, त्याचा फोन आमदार संजय केळकर हे जातीने घेतात, त्याच्याशी बोलतात. त्यामुळे लोकांना ते त्यांच्या घरातीलच आमदार वाटतात. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवताना ते शांत-संयमी भूमिकेतून वाटाघाटी करतात. अडवणूक होत असेल तर ते रुद्रावतार देखील घेतात. स्वच्छ प्रतिमा असल्याने अधिकारी वर्गात त्यांचा चांगलाच दबदबा आहे, अशा शब्दांत प्रमुख अतिथी आमदार निरंजन डावखरे यांनी श्री. केळकर यांच्या कामाचा गौरव केला. यावेळी ठाणे जिल्हा हाऊसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे, विकास पाटील, महेश कदम, डॉ.अमोल गीते आदी उपस्थित होते.**



## ठाणे पोलीस रेखा बाबुराव शिंदे ठरला महाराष्ट्र श्री च्या विजेत्या पोलीस आयुक्तांकडून सत्कार

ठाणे: पुण्याच्या थेउर येथे ५ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या महिला शरीरसौष्ठव स्पर्धेत ठाणे शहर पोलिस दलातील पोलीस अंमलदार रेखा बाबुराव शिंदे यांनी महाराष्ट्र श्री हा महत्वाचा मानला जाणारा किताब पटकावुन ठाणे पोलीसांच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला आहे. या कामगिरीनंतर ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी शिंदे त्यांचा सत्कार करून विशेष आभार मानुन पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

ही स्पर्धा मुंबई, ग्रेटर बॉम्बे बॉडी बिल्डींग असोसिअशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. दरम्यान अंत्यत चुरशीच्या झालेल्या त्या स्पर्धेत मुंब्रा पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार असलेल्या रेखा शिंदे यांनी आपले नाणे खणखणीत असल्याचे दाखवून दिले. तसेच शिंदे यांनी यापूर्वीही महाराष्ट्र पोलीस गेम २०२३ मध्ये पुणे येथे झालेल्या स्पर्धेत ५०-५५ वजनी गटामध्ये सुवर्णपदक व चॅम्पियनशिप मिळविली होती. याशिवाय २०२३ मध्ये हरियाणा येथे झालेल्या अखिल भारतीय पोलीस क्रीडा स्पर्धेमध्ये देखील सुवर्णपदक व चषक मिळविले होते. त्याचबरोबर २०२४ मध्ये लखनऊ येथे झालेल्या अखिल भारतीय पोलीस गेम रेसलिंग क्लस्टर या स्पर्धेत रौप्य पदक मिळवले होते. तर महाराष्ट्र पोलीस गेम-२०२४ नाशिक येथे झालेल्या स्पर्धेत देखील त्यांनी सुवर्णपदकावर नाव कोरले होते.

